# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

सुधारित परिपत्रक क्र. २४०/२०२३

**विषय : विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्कालिन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३—२४ मधील आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे **दि. ३० नोव्हेंबर, २०२३** पूर्वी विद्यापीठास पाठविण्यात यावा. विद्यापीठ हिस्सा पाठविताना, खालील सूचना विचारात घ्याव्यात.

१) सर्व विद्याशाखेतील सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर अभ्यासक्रमासांठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कामधील विद्यापीठ हिस्सा शेवटी दिलेल्या शुल्क तक्त्यानुसार पाठवावा.

२) ऑनलाईन प्रो—रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया बी.ओ.डी. पोर्टल अंतर्गत दिली आहे. **BOD Login** मध्ये 'प्रो—रेटा ऑनलाईन' हि लिंक वापरुन सदरची माहिती भरावयाची आहे.

३) ऑनलाईन पध्दतीमध्ये सर्व विभागांसाठी एकत्रित चलन काढावयाचे आहे. चलनाची विद्यापीठ प्रत जमा करताना मूळ प्रत (बॅकं शिक्का असलेली) शैक्षणिक प्रवेश विभागाच्या ऑनलाईन रिपोर्टसह शैक्षणिक प्रवेश विभाग येथे जमा करावी. तसेच शिक्का असलेल्या चलनाच्या छायांकित प्रती विद्यापीठ क्रीडा मंडळ व विद्यार्थी कल्याण मंडळ येथे त्या त्या विभागाच्या ऑनलाईन रिपोर्टसह जमा कराव्यात. चलन काढताना शक्यतो सर्व अभ्यासक्रमांचे मिळून एकच चलन काढावे. प्रत्येक अभ्यासक्रमाचे वेगवेगळे चलन काढण्याची आवश्यकता नाही.

**विशेष सूचना :**

१) विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा आदेश क्रमांक PGS/676, Dt. 28.2.2020 नुसार विद्यापीठास पाठवायचा आहे.

२) व्यवसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क व्यवसायिक दरानुसार पाठवावे.

३) परदेशी/सार्क देशातील विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा संदर्भ क्र. आयएससी/१०५० व १०५०—ए, दि.९ जून, २००८ नुसार पाठवावा.

४) नियमित प्रवेशित प्रती विद्यार्थ्यांमागे रु. ९/— प्रमाणे स्थानिक विभागीय क्रीडा समितीचा (उदा. पुणे शहर/अहमदनगर/पुणे जिल्हा/नाशिक) देय असलेला प्रो—रेटा संबंधित विभागीय समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. सदर प्रो—रेटा न भरल्यास आपल्या महाविद्यालयातील खेळाडूंना आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत सहभाग घेऊ दिला जाणार नाही.

तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाने प्रो—रेटा/शुल्काबाबत घेतलेल्या निर्णयांच्या बदलांची नोंद महाविद्यालयांना संलग्नित संस्थांना कळविण्यात येईल.

(टिप — वरील बाबतचे विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांचे जावक पत्र क्र. विक्रीम/प्रोरेटा/वि.स्था.क्री.स/३.१/५८१८ दि. २५ नोव्हेंबर, २०२२ नुसार कार्यवाही करावी).

५) मागील वर्षाचा वरील निधीतील हिस्सा पाठविला नसल्यास प्रलंबीत असल्याच्या कारणासह या कार्यालयास माहिती देण्यात यावी त्यानुसार प्रलंबीत असलेला विद्यापीठ हिस्सा जमा करण्यासाठी लिंक उपलब्ध करून देता येईल.

**शुल्काचा तक्ता**

| अ. क्र. | विभाग | निधी/शुल्काचे शिर्षक | अभ्यासक्रम | विद्यापीठ हिस्सा रु.मध्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | व्यावसायिक अभ्यासक्रम | | अव्यावसायिक अभ्यासक्रम |
| | | | | पदवी | पदव्युत्तर | |
| १ | विद्यार्थी कल्याण मंडळ | विद्यार्थी कल्याण निधी | पदवी व पदव्युत्तर | ४० | २० | ४० |
| | | विद्यार्थी सुरक्षा विमा निधी | पदवी व पदव्युत्तर | २० | | २० |
| | | आपत्कालीन निधी | पदवी व पदव्युत्तर | १० | | १० |
| २ | राष्ट्रीय सेवा योजना | रासेयो स्वयंनिर्वाह एकक शुल्क | पदवी व पदव्युत्तर | १० | | १० |
| ३ | विद्यापीठ क्रीडा मंडळ | विद्यापीठ जिमखाना शुल्क | पदवी व पदव्युत्तर | ५० | | ५० |
| | | अश्वमेध शुल्क (क्रीडा महोत्सव) | पदवी व पदव्युत्तर | २६ | | २६ |
| | | कॉर्पस फंड | पदवी व पदव्युत्तर | ०४ | | ०४ |
| | | स्पोर्टस फंड ( FIT India ) | पदवी व पदव्युत्तर | ५० | | ५० |
| ४ | शैक्षणिक प्रवेश विभाग | नोंदणी शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २५ | | २५ |
| | | संगणक शुल्क | पदवी व पदव्युत्तर | २५ | | २५ |
| | | विकास निधी | पदवी व पदव्युत्तर | ५० | | २५ |
| ५ | आरोग्य केंद्र | विद्यार्थी आरोग्य सेवा योजना | पदवी | २० | | २० |

वरील सूचना विचारात घेऊन शुल्क/निधीतील विद्यापीठ हिस्सा पाठवावा. पुढे असेही कळविण्यात येते की, अंतिम मुदतीपर्यंत चलनप्राप्त न झाल्यास अशा महाविद्यालयाबाबत विद्यापीठ अधिकार मंडळ जो निर्णय घेईल तो बंधनकारक राहील, कृपया याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/४२९८
दिनांक : १८/१०/२०२३

**उपकुलसचिव**
**शैक्षणिक प्रवेश विभाग**

प्रति,
मा. प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये.
मा. संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असेलेल्या सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.
प्रत :
मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, विद्यार्थी विकास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, क्रिडा व शारिरीक शिक्षण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे